I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 102-107
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# प्रतिमा इंगोले यांच्यां निवडक कथासाहित्यातील स्त्रीचित्रण

**भारती खापेकर व रोशनी गणेशराव घोडमारे(गतफणे)**
धनवटे नॅशनल महाविद्यालय, कॉंग्रेसनगर, नागपूर

Communicated : 16.01.2023 | Revision : 23.02.2023 Accepted : 21.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**
कथा हा साहित्यप्रकार काव्याइतकाच प्राचीन आहे. कथा वाङ्मयाचा परिचय आपल्याला बाल्यावस्थेत कथाश्रवणाने होतो. कथा हा वाङ्मय प्रकार लहाणापासून वयोवृध्दापर्यंत सर्वांना आवडतो. लहानपणी मनोरंजनासाठी, तारूण्यात उपदेशासाठी आणि वृध्दावस्थेमध्ये सुखाने वेळ घालविण्साठी कथाकथनाचे श्रवण केले जाते. बालपणी आईने सांगितेल्या चिऊकाऊच्या भाषेपासून ते तत्वज्ञानाची भाषा सारख्याच मनोरंजकतेने बोलण्याचे सामर्थ्य केवळ कथेजवळ आहे. केवळ स्त्रीकथाकार म्हणूनच नव्हे तर समग्र मराठी साहित्य परंपरेत ज्यांचे स्थान लक्षणीय आहे, अशा काही मोजक्या कथालेखकांत 'प्रतिमा इंगोले'यांचा समावेश करावा लागेल. त्यांचे लेखन नुसते स्त्रीप्रधानच नव्हे तर समकालीनतेशी घट्ट सांधा असलेले आणि वाचकाला आत्मशोध व आत्मपरीक्षण करायला लावणारे आहे. प्रतिमा इंगोले यांच्या बहुतेक कथा स्त्रीकेंद्री आहेत. त्यांनी आपल्या कथांतून व-हाडी ग्रामीण स्त्रीचे जीवन साकार केले आहे, पण या स्त्रीयांच्या व्यथा—वेदनांचे स्वर अखिल स्त्रीजातीच्या दु:खापेक्षा वेगळे नाही. तर प्रदेश चित्रणाच्या दृष्टीने स्त्रीकेंद्रित अनुभव त्यातून व्यक्त झाले आहे. लोकपरंपरेचा स्वीकार करणारी स्त्री व तिची भावावस्था त्यांनी दर्शविली आहे. गरीब शेतमजूर स्त्रीची अवस्था निखळ व-हाडी भाषेतून प्रकट केली आहे. या कथांच्या वाचनाने आपली स्त्रीयां विषयीची व भोवतालच्या समाजा विषयीची समजूत अधिक प्रगल्भ होईल या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्रतिमा इंगोले यांनी लिहिलेल्या निवडक कथासंग्रहातील स्त्रीचित्रणावर चर्चा करण्यात आलेली आहे.

**मुख्यशब्द :** इंगोले अंधश्रध्दा बेलपान सोन्याचा गोफ स्त्रीचित्रण

## प्रस्तावना :

डॉ. प्रतिमा इंगोले हया वैदर्भिय ग्रामीण कथालेखिका म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांचे पूर्ण नाव प्रतिमा पंजाबराव इंगोले आहे. त्यांचा जन्मत्यांचा जन्म १० ऑक्टोंबर १९५३ ला विदर्भातील अकोला जिल्हातील दानापूर हया गावी झाला. ग्रामीण भागात जन्म, बालपण, शिक्षण, लग्न व त्यानंतर संसार अशा पायरीपायरीने ग्रामीण लोकजीवनाचे झालेले दर्शन त्यांनी त्यांच्या लिखाणातून उतरविले प्रतिमा इंगोले यांची कथा ग्रामीण स्त्री-जीवनावरही विदारक प्रकाश टाकते. अंधश्रध्दाळू, देवदेवतांची भीती बाळगणारी, शकुनापशकुनांवर विश्वास ठेवणारी, पुरूषी वर्चस्वाखाली दडपली गेलेली, नवसासायासाच्या, भगताच्या पाठीमागे लागून स्वत:ची फसवणूक करून घेणारी, सुखाच्या संसाराचं स्वप्न उराशी बाळगणारीअपत्यांवर प्रेम करणारी, अशी ग्रामीण स्त्री 'प्रतिमा इंगोले यांच्या कथा' मधून उभी राहते. ती साधीभोळी असल्याने कोणत्याही बतावणीला ताबडतोब फसते. असे जरी असले तरी ती सारासार विचार करणारी, फसवणूकीने शहाणी होणारी स्त्री आता उभी रहात असल्याचा पुरावाही हया कथांमध्ये आढळतो.

डॉ प्रतिमा इंगोले यांच्या हजारी बेलपानं' अकसिदीचे दानं, सुगरणचा खोपा, जावयाचं पोरं, लेक भुईची इत्यादी पाच निवडक कथा संग्रहातील स्त्रीचित्रण या विषयाचा अभ्यास निवडक या शोधनिबंधात केलेला आहे.

### कथावस्तु

### १) हजारी बेलपान-

'हजारी बेलपान' हा प्रतिमा इंगोले यांचा प्रथम कथासंग्रह १९८४ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहात एकूण अकरा कथा हया व-हाडी बोलीतून लिहिलेल्या आहेत. निवेदन सुध्दा व-हाडी बोलीतच आहे. त्यामुळे त्यांची कथा श्रोत्यांवर, वाचकांवर अपेक्षित परिणाम करू शकते. त्यांनी 'हजारी बेलेलपान' या कथासंग्रहातून अस्सल वास्तव जीवनदर्शन घडविले आहे. ग्रामीण भागात वडिलांनी ठरविलेल्या मुलांशी लग्न करावे लागते. तेथे मुलींच्या भावनेला,

तिच्या इच्छेला काही प्राधान्य नसते. अशा वेळी मनासारखा पती, मिळाला तर आनंदाला पारावार नसतो. 'मियाँ बिबी राजी' या कथेतील पुष्पा ही दिल्या घरी सुखी आहे. ती आपल्या संसारात रममाण झाली आहे. पती, सासू, सासरे या सर्वांना, जपणारी स्त्री प्रतिमा इंगोले आपल्या कथेत चित्रित करतात.

'भिकीचे कपळे' मधील मास्तरीणला लूटणारी म्हातारी गोड बोलून संधी साधणारी, लुच्चेगिरी करणारी दिसून येते. नुकतेच लग्न झालेली नवविवाहिता आपल्या सासरी जाते. माहेरच्या पेक्षा चांगल घर सुख संपत्ती वाटयाला आलेली अशी टिमी आनंदात आहे. तिचे सोवळे-ओवळे, कौतुक करणाऱ्या नणंदा या कथेतून रेखाटतात. तर 'ठान बाई अवचित' मध्ये आपल्याला औषधाने आराम पडत नाही. म्हणून तीअंधश्रध्देला बळी पडते. 'गुरूरूप सेकरेटरीपोटे ्ट्ट'् मधून मुलींचा लाजरा स्वभाव चित्रित होतो. 'खोयेयमोळेळी' मध्ये सासूच्या मोठेपणाची खूप गंमत येते. मुलांच्या लग्नाचे दागिने, कपडे दाखवण्यात सासू रमते. तिचा बोलघेवडा स्वभाव व मोठेपणाच्या गोष्टी यामुळे फजिती होते. अशा स्वभावाची माणसे स्वत:ही समाधानी नसतात व इतरांनाही समाधान देत नाहीत. ग्रामीण भागात कुठलीही गोष्ट करायची तर ती नवऱ्याल विचारल्याशिवाय स्त्रीया करीत नाहीत. नवऱ्याला मोठेपणा देणे हे प्रत्येक स्त्रीचे कर्तव्य असते;

परंतु 'चोरावर मोर ' मध्ये तीन मुली झाल्या तरी कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केली नाही तर पुन्हा तेच नशीबी येईल म्हणून या कथेतील नायिका स्वत:च निर्णय घेवून डॉक्टरकडून तिसऱ्या मुलीच्या वेळेला कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करून घेते. येथे तिचे स्वतंत्र वागणे सुधारणेचे पाऊल म्हणावे लागेल. तर 'धुयमाती' मध्ये स्त्रिया स्तुती प्रिय कशा असतात. आणि गोड बोलण्यामुळे त्या कशा फसतात (यावर प्रतिमा इंगोले प्रकाश टाकतात) याचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी केलेले आहे.

**२)'अकसिदीचे दाने'**

हा प्रतिमा इंगोले यांचा दुसरा कथासंग्रह १९८६ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहात माणसातील माणुसकी, मुक्या प्राण्यांविषयीची माणासाची निष्ठुरता, स्वत:च्या मोठेपणा, पुरूषांकडून स्त्रीयांना होणारा त्रास इत्यादी गोष्टींचे दर्शन घडते.

'अकसिदीचे दाने मध्ये सुमीची प्रसुतीच्यावेळीची सहनशीलताचित्रितकेलेली आहे. तर 'दारका' मध्ये बैलाच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करणारी स्त्री भेटते. पाळीव जनावरांवर स्वत:च्या मुलाप्रमाणेच प्रेम करणारी, दारच्या वेलावर प्रेम करणारी, घरच्या गायीचे कालवड वाचत नाही म्हणून नवस करणारी ग्रामीण स्त्रीचे चित्रण केले आहे. मुलगा कामचुकार असतो. तो पुढे दारका काढणार नाही. म्हणून पै पै जमा करून जावेला देते व मुलाने दारका काढली नाही तर तू दारका काढजो म्हणून सांगते. नवस जर पूर्ण केला नाही तर अघटित घडेल अशी शंकेची पाल तिच्या मनात चुकचुकते. म्हणून जावेला दारका काढण्याचा तिचा आग्रह असतो. माहय श्राध्द करू नको पण दारका काढण्यात खंड पाडू नको असे पुन्हा पुन्हा विनविते. या ठिकाणी बैलाविषयीची माया दिसून येतेच शिवाय जाऊशी बहिणीप्रमाणे वागणे यावरून तिच्या मायाळू स्वभावाची प्रचीती येते.

'सर्वा' याकथेतील स्त्री क्रांती मुलीसाठी जगते. नवरा मेल्यानंतर स्त्रीच्या वाटयाला आलेले दु:ख येथे व्यक्त होते. नवरा मेल्यावर विम्याचे पैसे बायकोला मिळणार असते परंतु तिच्या अशिक्षितपणाचा फायदा घेवून तिचा दीर तिचे पैस लांबवितो. तेव्हा ती हतबल होते; दुबळी ठरते. पुन्हा मोलमजूरी करून जगते. असे विधवेचे जीवन प्रतिमा इंगोले यांनी रेखाटलेले आहे.

' सोन्याचा गोफ ' हया कथेतील रूकमाईने पिढीजात सोन्याचा गोफ जपून ठेवलेला पण नणंदेच्या ऐन लग्नाच्या वेळी रूसलेल्या नवरदेवाला तो सोन्याचा गोफ देण्यास तयार होणारी व घराण्याची लाज, इज्जत राखून ठेवणारी 'रूकमाई मोठया मनाने तो देते. येथे विनातक्रार लग्नप्रसंग पार पाडण्यामध्ये तिची मदत होते. समजदार स्त्रीचे दर्शन

या कथेतून घडते. भारतीय परंपरेतील सासू-सूनांचे नाते हे वैरिणीचे नाते असते. क्वचितच त्या मैत्रीनी किंवा मायलेकी सारख्या नांदतात(दिसतील) दिसतात. 'चाकोली' या कथेतील सासूला सुनेला, पिंचू चावल्याचे दुःख झाले त्याचे फारसे वाईट वाटले नाही पण मुलीला विंचू चावल्याचे दुःख फार मोठे होते. प्रतिमा इंगोले यांनी चाकोली या कथेतून 'आपलं ते मापलं दुसऱ्याचं ते कुठे पाहू' ही मानसिकता दर्शविली आहे. (रेखाटली आहे.) तसेच चाकोली या कथेतून सुनेची सहनशीलता, कष्टाळू वृत्ती प्रतीत होते.

'लोकेकवानी'या कथेतूनही सोशिक, कष्टाळू सुनेचे दर्शन घडते. तर गावगाडयातील पाटील, इनामदार गरीब जनतेची वेगवेगळया पातळीवर पिळवणूक करतात व निष्पाप जीवाचा बळी घेतात तेव्हा आईचे मन आकंदते. तिच्या मनाची घालमेल चित्रित होते. ही स्त्री गरीब असून स्वाभिमानी आहे. चारित्र्यसंपन्न आहे, परंतु मुलीच्या बाबतीत आपण कसाई ठरलो म्हणून मनाला बोचणारे डंख हे भयानक असतात. त्यामुळे स्त्रीच्या मनाची उलथापालथ या ठिकाणी दिसून येते.

तर 'भिंगरी' या कथेत वृध्द गंगाबाईचे भिंगरीसारखे जीवन पाहून मन व्यथित होते. सगे सोयरे असून थोडी श्रीमंती असली की गरिबांना कसे छळतात त्यातून गंगाबाईच्या मनाची घालमेल चित्रित होते.

**३) सुगरणचा खोपेपा**

'सुगरणचा खोपा' हा प्रतिमा इंगोले यांचा तिसरा कथासंग्रह होय. यातील पहिली कथा आहे 'बिऱ्हाड' 'बिऱ्हाड' सारख्या कथेतून दारूडा मुलगा मायला पंचफुलाला घरातून हाकलून लावतो म्हणून ती उघडयावर संसार उभा करते. चार दोन भांडयांनी सजवते, पावसाळा आला की दुसरीकडे जायचे. सदा पाठीवर बिऱ्हाड घेतलेले. उन्हापावसापासून संरक्षण देणारे छप्पर तिच्या डोक्यावर नाही, ते दुःखही ती समंजसपणे झेलत उभी आहे. म्हातारवयातील तिच्या जीवनाची धडपड (परवड), कुटूंबासाठी (खस्ता खाऊनही) झिजूनही नशिबी आलेले भोग, कष्टाळू वृत्ती, परिस्थितीला सामोर जाण्याची वृत्ती, नवऱ्यावरील विश्वास, प्रामाणिक वृत्ती इत्यादी पंचफलाच्या ठिकाणी दिसून येते.

तर 'भिंगरी या कथेत वृध्द गंगाबाईचे भिंगरीसारखे जीवन पाहून मन व्यथित होते. सगे सोयरे असून थोडी श्रीमंती असली की गरिबांना कसे छळतात त्यातून गंगाबाईच्या मनाची घालमेल चित्रित होते.

**४) जावयाचं पोर**

सुरूवातीलाच त्यांनी त्यांनी स्त्री-जन्माची 'कहाणी' सांगितलेली आहे. 'जावयाचं पोर 'हा प्रतिमाइंगोले यांचा चौथा कथासंग्रह आहे हयाकथासंग्रहात दुसरी कथा सोननिळ पाखरू' आहे. 'सोननिळ पाखरू' ही सगळयात काव्यात्मक नाजूकभाव व्यक्त करणारी कथा आहे. पुरूषी व्यसनामुळे स्त्रीयांची होणारी कुचंबना या कथेतुन दिसून येते नवरा दारूडा असला तरी सुनेवर माया करणारी परंपरागत मानसिकतेपासून थोडी वेगळी सासू येथे भेटते.

'नागवेलेल' या कथेतील नायिका विवाहीत स्त्री असून सतत नवऱ्याचा जाच सहन करून वडिलांच्या अब्रुस्तव जगते आहे. नवरा परस्त्रीलोलुप असला की स्त्रियांची कशी कुतरओढ होते, हे या कथेतून आपल्याला दिसून येते 'नागवेलेल' प्रमाणे बाहेरख्याली पती असलेला वरून प्रेमाचे चाळे करीत असला तरी आतून

काळवंडलेला असतो. तरीही माया सहन करते आणि आता तर बाळाला जन्म दिला त्याच्यासाठी जगावे लागणार. मातृत्वापूढे कितीही कष्ट पडले, अन्याय सहन करावा लागला तरी स्त्रीला फारसे जाणवत नाही. ती जुने विसरून नव्याने सुरूवात करते नवी उमेद त्यांच्या कथांमधून जाणवते.

आपल्या मंगळसूत्राची होणारी विटंबना पाहून रात्रभर तडफडणारी माया'मंगंगळसुत्र' कथेतून भेटते. तर आपल्या नवऱ्याला मातृत्व नको हे ध्यानात आल्याने मनोमनी गुदमरून गेलेली सुधा 'हव्यास' कथेतून समोर येते. नुकतेच नविन लग्न झालेली, व पहिल्याच रात्री नवरा व्याभिचारी आहे हेकळल्यावर मनामध्ये अनेक प्रश्नांचे कल्लोळ उभे राहिलेली कुमुद कथेमध्ये दिसते.'कल्लोळ' या 'जावयाचंपोर' मधील शांताचानवरा बाहेर ख्याली असल्यामुळेतीवडिलांसोबत माहेरी निघून जाते. तिला मुलगा होतो. नऊ वर्षापर्यंत तिच्याजवळ राहतो. शाळेत जाऊ लागतो. जावई त्याला घरी घेऊन जातो. कोर्टात केस दाखल केल्यानंतर मुलगा बाबजवळ राहतो म्हणाला.आजी,आजोबा,आईनेलहानपणापासून वागवले ते सर्व मातीत मिसळले होते. जावयाचे पोर हरामखोर निघाले होते. शेवटी हतबल झालेले आई यात दिसून येते.

'दुपवा' कथेतील समरती दोनचार घरची मोलकरणीची कामे करायची. दुपवा म्हणजे गर्भ पडणे. पतीच्या शरीरसुख घेण्याच्या वासनेमुळे पोटातील वेदना वाढून रक्तभरल्या अवस्थेत पडलेला गर्भ पाहून पतीबद्दल तिला किळस व तिरस्कार वाटू लागणे स्वाभाविक आहे.

'जखम' कथेतील तारूण्यात पदार्पण करणारी मुले-मुली नकळत, अजाणतेपणी एकमेकांच्या प्रेमात पडतात. पण प्रेम असफल झाले की, मुलीच्या मनावर होणारे परिणाम तिच्या आयुष्याला वेगळीच कलाटणी देतात.

आपला असूनही नसतो तो 'परका' 'परका' कथेतील मुलगाच आईसाठी'परका' होतो. मुलाचा सुखाचा संसार पाहून समाधान मानणारी स्वत:ला सांभाळत आपला तोल ढळू न देता मुलाला व सुनेला सुखावणारी, समजदार आईचे दर्शन या कथेत घडते. तर 'बोरं घ्या बोरं !'य ा कथेमधली आजी शिक्षण शिकायला मिळाले नाही म्हणून खंत व्यक्त करते. ती प्रामाणिक, हुशार, मोठ्या मनाची, जिव्हाळा ओतणारी अशी आहे.

**५) लेक भुईची**

डॉ.प्रतिमा इंगोले यांचा पाचवा कथासंगह 'लेके भुइईचची' हा होय. प्रतिमा इंगोले यांनी या संग्रहातही स्त्रीच्या दु:खाचे वेगवेगळे पैलु साकारलेले आहेत. 'लेक भुईची या कथासंग्रहात एकुण अकरा कथा आहेत. त्यातील पहिली कथा 'डुबतीची पावलं' होय.'डुबतीची पावलं' ही शेतकऱ्याच्या दयनीय परिस्थितीची आणि हुंडाबळीची कथा आहे. सीताबाईचे वडील जनकराव तिचे लग्न हुंडा देवून जुळवतात, पण नापिकीमुळे ते वेळेवर होत नाही. नवरा मुलगा दुसरी मुलगी बघून लग्न उरकून घेतो. मुलगी सीताबाईला मात्र वडीलांचा त्रास पाहवत नाही म्हणून ती आत्महत्या करते.

दुसरी कथा आहे, 'परायाची लेक' म्हणजे परक्याची मुलगी एकाच घरात गरीब श्रीमंत असा भेदभाव केल्यामुळे पैसेवाल्याच्या मुलीचे, तिच्या माहेरच्या लोकांचे मानपान होता. परंतु केसरगरीबाघरचीलेकअसल्यामुळेतिच्यावाटयाला अवहेलनायेते.

तर 'मायमका' या तिसऱ्या कथेत 'पांढ्ढी आजी' सावत्र आई असून सर्वांची माय म्हणून समोर येते. अशी ही प्रेमळ, मायाळू पण तितकीच करारी आजी समयसूचकतेने वागतांना दिसते.

चौथी कथा आहे-'वटी' वटी म्हणजे ओटी. पुंजा ही विधवा मांगीण मोठ्या वाडयात कामाला होती. परंतु वाडयातील आत्याबाईच्या एकुलत्या एक मुलीच्या पहिल्या बाळंतपणासाठी पुंजाला

मुलीच्या सासरी शहरात पाठविण्यात येते. तेथून परत येतांना मुलीची सासू मूठभर धान्य तिच्या ओटीत टाकते आणि पहिले बाळंतपण माहेरी असते म्हणून मुलीच्या माहेरीच जे काय मागायचे ते माग असे सांगून तिला रिकाम्या हाताने रवाना करते. पुंजा वाडयात परत आल्यावर आत्याबाईने तिला धुडकावून लावले तरी मुलांचे भुकेले पोट तिच्याकडून पाहवत नसल्यामुळे वाडयाच्या दारात धान्याच्या, ओटीच्या अपेक्षेने ती बसूनच राहिली. पुंजाच्या दयनीय परिस्थितीचे वर्णन येथे दिसून येते.

पाचवी कथा 'पयस्याची मेख ' मध्ये संपतला चार मुली असतात. मोठया मुलीचे वय जास्त असल्यामुळे तिसरपण्यावर श्रीमंत घरी दिल्या गेली, कसायाला गाय विकतात तसेच मुलीला विकले हे ग्रामीण,भागातील वास्तव दर्शन प्रतिमा इंगोले 'पयस्थाची मेखे मधून रेखाटतात. तर 'भोंडंड' या सहाव्या कथेमध्ये लहान मुलाला कुणाच्या भरवशावर ठेऊन कामाला जाणारी गोकुळी. पोटाची खळगी भरण्यासाठी बाहेर पडते अन् इकडे घात होतो. तिचा लाडानवसाचा मुलगा माडीवरून खाली पडतो आणि मरतो, ते दु:ख तिला सहन होत नाही असे हृदयद्रावक चित्रण या कथेत येते.

'सपन' कथेमध्ये नवीन पिढीच्या बदलणाऱ्या मानसिकतेचे दर्शन घडते. तर'कोळलीढन्न' या कथेमध्ये सरकारच्या कायदयाने गरिबाची कशी ससेहोलपट होते याचे चित्रण येते. 'दीठ' या कथेमधुन शहरी आणि ग्रामीण स्त्रियांची मानसिकता अनुभवायला मिळते.

'डोयाचा खेय' या दहाव्या कथेमध्ये कापसाला जाणाऱ्या स्त्रियांना रस्त्यात म्हातारा दिसतो. म्हाताऱ्याला बोलत जात असतांना कसाई गाय घेऊन जातांना दिसतो. म्हाताऱ्याला गायीची कीव येते व तो गाईला जास्त किंमतीने खरेदी करतो. गोहत्या त्याला मान्य नसल्यामुहे तो गायीला वाचवतो.

जुलूमाविरूध्द आवाज उठविणाऱ्या, अन्यायाविरूध्द उभ्या ठाकलेल्या, हिंदू स्त्रियांना मानाने जगायला लावणाऱ्या शिवबाच्या राज्याभिषेकाच्या सोहळयाने जिजाऊचे स्वप्न साकार झाले. इथे मातेच्या मनात दाटून आलेले अंतस्वर बाहेर पडतात. तसेच यशस्वी, समाधानी, स्त्रीचे दर्शन घडते.

'लेक भुईची' या कथेत प्रतिमा इंगोलेयांनी जिजाबाईंना 'लेक भुईची' म्हटले आहे. जिजाबाईचे शहाजी राजांसोबत लग्न झाले. पण त्यांनी खरोखरच एकत्र संसार केला नाही. कारण शहाजीराजांचे इंग्रजांसोबत राहणे, वागणे जिजाबाईंना पसंत नव्हते. त्यामुळे शिवाजीराजांना घेऊन त्यांच्यावर योग्य संस्कार करून ही लेक भुईची एकटी राहिली. आणि तिने शिवरायांना घडविले. जुलूमाविरूध्द आवाज उठविणाऱ्या, अन्यायाविरूध्द उभ्या ठाकलेल्या, हिंदू स्त्रियांना मानाने जगायला लावणाऱ्या शिवबाच्या राज्याभिषेकाच्या सोहळयाने जिजाऊचे स्वप्न साकार झाले. इथे मातेच्या मनात दाटून आलेले अंतस्वर बाहेर पडतात. तसेच यशस्वी, समाधानी, स्त्रीचे दर्शन घडते.

**निष्कर्ष :-**

डॉ. प्रतिमा इंगोले यांनी वैदर्भीय ग्रामीण स्त्री तिच्या व्यथा-वेदना, सुख-दु:ख, तिची मानसिकता तिच्या अंतरंगात शिरून रेखाटलेली आहे असे निदर्शनास येते.

डॉ. प्रतिमा इंगोले यांनी लिहिलेल्या कथा या वास्तव वाटतात. कथेतील संवाद हे वऱ्हाडी बोलीत असल्यामुळे त्यात आणखी गोडवा निर्माण झाला आहे.

प्रतिमा इंगोले या सर्व कथांमधून ग्रामीण स्त्रीचे भावजीवन सहृदयतेने टिपतात. या स्त्रिया सोशिक असल्यमुळे पुरूषांनी वर्चस्व गाजवले तरी आक्रमक पवित्रा घेत नाहीत.

प्रतिमा इंगोले यांच्या कथांमधील स्त्रीपात्रे स्वकष्टाने राबून स्वावलंबी, सक्षम झाल्या

आहेत. स्वबळावर पुढे जाण्याची ताकद त्यांच्यात आहे; पण पुरूषाचा पाठिंबा त्यांच्यामागे आहे. फक्त निर्णय त्यांनी त्यांचा स्वत:
घेतलेला आहे. आजच्या ग्रामीण व शहरी वातावरणात वाढलेल्या मुली शिकून अनुभवी व हुशार झाल्या आहेत. त्यांना त्यांच्या पायावर उभे राहून काहीतरी कर्तृत्व करून दाखवायचे आहे. त्यासाठी स्वत: स्त्रियांनी हे धाडस केले, तरच हुंडाबळी, दारूबंदी हयाला आळा बसेल.
प्रतिमा इंगोले यांची कथा ग्रामीण वास्तव उलगडून दाखवते. ग्रामीण वास्तवाला विकृत रूप येऊ न देता जे जसे आहे ते तसे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. म्हणूनच त्यांची कथा श्रोत्यांवर, वाचकांवर अपेक्षित परिणाम करू शकते. या कथांतील स्त्रीपात्रांच्या अनुभवावरून एकच शिकण्यासारखी गोष्ट आहे, ती म्हणजे नुसते सुशिक्षित किंवा सुसंस्कृत असून चालत नाही,तर अनुभवाने काही गोष्टी अंमलातही आणाव्या लागतात. त्यामुळेच स्त्रियांचे होणारेशोषणबंद होईल. स्त्रीस्वभावाचे विविधपदरत्यांच्या कथांमधून प्रकट झालेले आहेत.

**संदर्भ:**


प्रतिमा इंगोले– हजारी बेलपान, सोनल प्रकाशन, दर्यापूर तृतीयावृत्ती १९९७

प्रतिमा इंगोले – अकसिदीचे दाने, सोनल प्रकाशन, दर्यापूर चतुर्थवृत्ती १९९८

प्रतिमा इंगोले – सुगरनचा खोपा, सोनल प्रकाशन, दर्यापूर चतुर्थवृत्ती २००२

प्रतिमा इंगोले – जावयाचं पोरं, देशमुख आणि कंपनी पब्लिकेशन, पुणे,प्रथमावृत्ती १९८९

प्रतिमा इंगोले – लेक भूईची, सोनल प्रकाशन, दर्यापूर तृतीयआवृत्ती २००२ ६) वर्षा चिखले – वैदर्भीय ग्रामीण कथात्म साहित्य: रूप आणि स्वरूप, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती २०१३

इन्दुमती शेवडे – मराठी कथा उगम आणि विकास, सोमय्या पब्लिकेशन, मुंबई १९६३

रेखा जगनाळे –प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००६

नागनाथ कोतापल्ले – ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, इंद्रायणी प्रकाशन, पुणे १९३५